

# झिप सह एक बहुउद्देशीय पिशवी तयार करा

ह्या वीडियोमध्ये तुम्ही शिकाल ज़िपर पौऊच कसा बनवायचा. हे पौऊच अत्यंत सुलभ आणि मल्टीपर्पस आहे.



पौऊच बनवण्याकरिता तुम्हाला लागणार एक झिप ज्याची लांबी तेरा इंच आहे. लूप बनविण्यासाठी ६ ते ८ इंच लांबीची रीबीन मॅचिंग दोरा भरलेला एक बॉबिन आणि अर्थातच एक रंगीत कपडाचा तुकडा जो बारा बाय साडे अकरा इंचाचा आहे, तर चला सुरू करूया.

झिपर ला कपडाच्या रुंद भागावर सुलट्या बाजू समोरासमोर असतील तसे ठेवा, झिपर ला त्याच्या धारेवर संरेखित करा, आणि बीडीत पिन्स लावा. रनर खेचून झीपर उघडा.

झिपर ची दुसरी बाजू कपडाच्या उलट दिशेला लावा, झिपर च्या धागेला कपडाबरोबर संरेखित करा आणि अजुन थोड्या बीडीत पिन्स लावा.

आता मशीन कडे या ए फुट ला झीपर फुट शी पुनरषित करा. सुई वर ठेवा लिवर वर करून क्लॅप्स सोडा आणि प्रेसर फुट सोडवा.

झीपर फुट ला स्थानीत करा आणि प्रेसर फुट लिवर ला खाली करून त्याला बंद करा, आता झीपर च्या एका बाजूला झीपर  फुट च्या उजव्या धारे बरोबर दुसर्या बाजूला जास्त जागा सोडून संरेखित करा. आता झीपर च्या धारेला व्यवस्थित शिवा.

जेव्हा पिना येतील तेव्हा त्यांना काढायाच विसरू नका, शेवटी कपडाला मशीन मधून काढाआणि दोरे कापून टाका.



झीपर च्या उलट्या बाजूला पुन्हा तेच करा. जश्या पिना येत जातील तश्या त्यांना काढत राहा, एकदा ही क्रिया झाली, कपडाच्या दोन्ही बाजूला तुमच्याकडे झीपर आहे.

रनर खेचून झीपर बंद करा. कापड सपाट दुमडा म्हणजे झीपर कपडाच्या मधोमध संरेखित होणार.

पिनाने कपडाचे स्तर टिकवा, जसे वीडियो मध्ये दाखवले आहे. रीबीन घेऊन एक दोन इंच लांबीचा आणि दुसरा तीन इंच लांबीचा तुकडा कापा.

आता रीबीन चा छोटा तुकडा दुमडा आणि त्याचे शेवट मूळ कपडाच्या मधोमध झीपर च्या खाली संरेखित करा. शेवटला पिना लावून घ्या.



रीबीन चा लांब तुकडा सुद्धा अशाच पद्धीतेने उलट बाजूला पिना लावून टिकवा.

आता तुम्ही दोघ्या उघड्या बाजूंना शिवायला तयार आहात. झीपर फुट ला ए प्रेशर फुट शी पुन्हा पुनरषित करा. सुई वर आहे याची खात्री करा.

ज्या रीबीन लूप्स ला तुम्ही दोन्ही बाजूंनी पिना लावल्या आहेत रिवर्स स्टिच सेलेक्टर चा वापर करून त्यांना रिवरस स्टिच ने घट्ट शिवा. उलट बाजूला पुन्हा तेच करा.



आता आपण बाजू शिवायला लागुया. कपडा ची धार नीडल प्लेट च्या धार च्या अर्धा इंचा च्या खुणा बरोबर संरेखित करा आणि शीलाई मारुन बंद करा. झीपर ची धार येई पर्यंत शीलाई मारा. रिवर्स स्टिच सेलेक्टर चा उपयोग करून शिवन व्यवस्थित बंद करा.

मग सुई वर करून प्रेस्सर फुट वर करा आणि झीपर च्या कडक भागावरून जा. दुसरी बाजू शिवायला सुरूवात कराआणि तिथेपण रिवर्स स्टिच वापरा. कपडाच्या उलट भागापर्यंत शीलाई मारत राहा.

आता दुसर्या बाजूला परत तेच करा. इथे जेव्हा तुम्ही झीपपर्यंत पोहोचाल ती उघडा. सुई आणि प्रेसर फुट वर करून त्यांच्या वरुन जा.




दोन्ही बाजूंना बंद करणे महत्वाचे आहे. दोरी कापा, आणि तुमच्या वर टेबल कडे परत जा. आता झीपर पौऊच च्या बाजू एकत्र शिवा.


आता पिना काढा. ज्या तुम्ही रिब्बन्सआत मध्ये धरून ठेवण्यासाठी वापरल्या होत्या. दाखवल्या प्रमाणे दुमडलेली बाजू आणि सील एकत्रित करून एक कोपरा बनवा. कोपरा सपाट ठेवा आणि दीड इंच कोपर्याच्या आतून मोजा.



एक बिंदू मार्क करा आणि एक सरळ रेघ ओढा. पीण लावून दुमडलेला फोल्ड टिकवा. बाकीच्या तीन कोपरापर्यंत तसेच करा. एकदा का तुम्ही चारी कोपर्यांना मार्क करून पिना लावल्या की त्यांना शिवायला घ्या. मार्क केलेली बाजू प्रेसर फुट च्या खाली संरेखित करा. स्टिच पॅटर्न सेलेक्टर ला ए वर सेट करा आणि स्टिच लेंथ सेलेक्टर ला २ आणि ३ च्या मध्ये ठेवा. स्टिच बंद करा, आणि रेघेवर शीलाई मारा.



मशीन थांबवा आणि कापड काढा. दाखविल्या प्रमाणे चारी कोपरे पुन्हा शिवा. आठविणीणे प्रत्येक शेवट घट्ट शिवून बंद करा. आता पाव इंच सोडून पिना काढा आणि कोपरा कापा.



उरलेल्या तीन कोपर्यांनाही तेच करा. झिपचा अतिरिक्त भाग दोन्ही बाजूंनी कापा आणि थोडी जागा सोडा. तुमचे काम आता झालेच आहे, आता पौऊच ला आतून बाहेर करा. त्यांचे कोपरे हळूवारपणे व्यवस्थित करा. तुमच बॉक्स चे झीपर पौऊच आता तयार आहे.

होत्रा सोप्प! तर आता वेगवेगळ्या आकारांबरोबर कापड आणि रंगांबरोबर प्रयोग करा, तुमच्यातल्या सर्जनशिळतेला अवकाश द्या.